UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९१ • मार्च २०२३ • पुरवणी अंक ३



इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे



इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

## विद्यमान पदाधिकारी व कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| • मा. श्री. मदनलाल मिश्रा | अध्यक्ष |
| • श्री. आनंद राजवाडे | प्रमुख मार्गदर्शक |
| • मा. दलूभाऊ जैन | उपाध्यक्ष |
| • श्री. संजय मुंदडा | कार्याध्यक्ष |
| • श्री. लखनजी भतवाल | कार्योपाध्यक्ष |
| • श्री. प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे | मुख्य चिटणीस |
| • श्री. व्यंकटेश दाबके | खजिनदार |
| • श्री. प्रा. सुनिल मुंदडा | वस्तु संग्रहालय चिटणीस |
| • प्रा.डॉ. सौ. मृदुला वर्मा | संशोधक त्रैमासिक चिटणीस |
| • श्रीमती जयश्री शहा | ग्रंथालय चिटणीस |
| • प्रा.डॉ. सौ. उज्वला नेहते | संशोधन व प्रकल्प चिटणीस |
| • प्राचार्या डॉ. सुनंदा अहिरे | संशोधन अधिकारी |
| • सौ. लता आगीवाल | कार्यकारी सदस्य |
| • प्रा.श्री.श्रीपाद नांदेडकर | क्युरेटर (पदसिद्ध) |

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

**पुरवणी अंक ३ – मार्च २०२३ (त्रैमासिक)**

- शके १९४४
- वर्ष : ९०
- पुरवणी अंक : ३

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- प्राचार्य डॉ.सुनिल हेळकर
- प्रा. डॉ. प्रेमचंद गायकवाड
- प्रा. डॉ. गोवर्धन दिकोंडा

*** प्रकाशक ***

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

३६. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचे ऐतिहासिक विवेचन

- डॉ. एस. आर. कट्टीमनी ---------- १४९

३७. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे स्त्री शिक्षण विषयक विचार व कार्य

- कु. शुभांगी मनोहर आवारी ---------- १५५

३८. राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य

- प्रा. डॉ. विठ्ठल कल्लापा दळवी ---------- १५९

३९. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची आपत्ती व्यवस्थापनातील प्रासंगिकता

- डॉ. गणेश पंढरीनाथ भामे ---------- १६३

४०. छत्रपती राजश्री शाहू महाराज यांचे आरक्षण विषयक धोरण: एक ऐतिहासिक अध्ययन

- डॉ. प्रज्ञा कामडी ---------- १७०

४१. छ. शाहु महाराज यांचे शैक्षणिक कार्य : आजची प्रासंगिकता

– सहयोगी प्राध्यापक इंगळे किशोरकुमार मनोहरराव ---------- १७५

४२. मागासवर्गीयांच्या मुक्तीतील क्रांतिकारी महानायक राजर्षी छत्रपती शाहू महाराज : ऐतिहासिक विश्लेषण

– डॉ.निशांत भिमराव शेंडे ---------- १७९

४३. राजर्षी शाहू महाराज यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार

– आरती एम. देशमुख ---------- १८३

४४. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक कार्य आणि जागृति

– डॉ. सचिन ज्ञानेश्वर मोरे ---------- १८७

४५. शैक्षणिक क्रांतीचे अग्रदूत राजर्षी शाहू महाराज : ऐतिहासिक अध्ययन

– श्री. संतोष गोहोकार ---------- १९१

४६. राजर्षी शाहू महाराजांचे समाज परिवर्तनाच्या दृष्टीने अस्पृश्य उद्धाराचे कार्य

– प्रा. केंगार आप्पासाहेब नामदेव ---------- १९४

४७. राजर्षी शाहू महाराजांचे समाजसुधारणा विषयातील स्त्री उद्धाराचे कार्य

– डॉ. गौतम नामदेव ढाले ---------- १९८

ISSN No 2394-5990

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचे ऐतिहासिक विवेचन

**डॉ. एस. आर. कट्टीमनी**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर संलग्नीत
भ्रमणध्वनी: ९८६००९०६८९

**घोषवारा:**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे फक्त करवीरचे राजे किंवा इंग्रजांचे मांडलिक संस्थानिक म्हणून इतिहासात नोंदले नाहीत, शाहू महाराज म्हणजे बहुजन समाजाचा उद्धारकर्ता, आधुनिक कोल्हापूरचे जनक व सामाजिक समता प्रस्थापित करणारे धोरणी युगपुरुष म्हणून नोंदले गेले. भारतात सामाजिक, शैक्षणिक व नोकऱ्यांमध्ये बहुजनांच्या आरक्षणाची तरतूद करणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे आद्य सुधारक होत. कोल्हापूर नगरीला कला, क्रीडा, संस्कृती, शिक्षण याबाबतीत अग्रेसर बनवण्याचे काम शाहू महाराजांनी केले. कोल्हापूरला कलानगरी बनवून कोल्हापूरचा नावलौकिक भारतात निर्माण करण्यात महाराजांचा खूप मोठा हातभार आहे. शाहू महाराजांचे सामाजिक विचार हे आधुनिक मानवतावादी मुल्यविचारांची पेरणी करणारे होते. त्यांनी अंधश्रद्धा, कर्मकांडे व दैववाद यासारख्या पारंपारिक विचारांच्या मानसिकतेवर प्रहार केला. महाराजांनी शिक्षण प्रसाराद्वारे बहुजनांचे अज्ञान दूर केले व त्यांना हजारो वर्षांच्या सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यास कायद्याचे पाठबळ दिले.

महाराष्ट्रात अनेक सामाजिक व शैक्षणिक विचारवंत होऊन गेले, परंतु छत्रपती शिवाजी महाराजांनंतर खरा समाजवाद आणि समतेची शिकवण देणारे शाहू महाराज लोकोत्तर पुरुष होते. पुरोगामी महाराष्ट्राच्या सामाजिक आणि वैचारिक जडणघडणीचे श्रेय शाहू महाराजांकडे जाते. त्यांनी दिलेला समतेचा संदेश व त्यासाठी केलेले कार्य पाहता त्यांचा २६ जून जन्मदिन हा 'सामाजिक न्याय दिन' म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. प्रस्तुत शोधनिबंधातून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्यांचे ऐतिहासिक विवेचन केले जाणार आहे.

**कळीचे शब्द:** करवीर, मांडलिक, आरक्षण, पुरोगामी, मानवतावाद, कलानगरी, दैववाद, अधिष्ठान, सामाजिक न्याय दिन

**प्रस्तावना :**

आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये एक आदर्श व लोक कल्याणकारी राजा म्हणून कोल्हापूर संस्थांनचे राजे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची ओळख आहे. बहुजन समाजाचा उद्धार करण्यासाठी त्यांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात आमुलाग्र बदल करून त्यांची विचारप्रणाली बदलण्याचे महत्वपूर्ण कार्य शाहू महाराजांनी केले. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थांनचा शाश्वत विकास होण्यासाठी अनेक योजना राबवल्या, म्हणूनच कोल्हापूर व महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासामध्ये त्यांचे नाव सुवर्णाक्षराने लिहले गेले आहे.

१९१२ मध्ये शाहू महाराजांनी प्रत्येक खेड्यामध्ये एक नवीन शाळा काढून त्यावर वतनदार शिक्षक नेमले होते. परंतू याद्वारे शिक्षणाचा योग्य तो प्रसार होत नसल्याचे दिसून आल्याने महाराजांनी १९१७ मध्ये वतनदार शिक्षक पद्धत बंद करून, पगारी शिक्षक योजना सुरू केली. शिक्षक प्रशिक्षणासाठी कोल्हापूर येथे अध्यापक विद्यालय सुरु केले. यातील शिस्त टिकून राहण्यासाठी शिक्षकांच्या वर्तवणुकीचा दाखला व २५ च्या आतील वय अशा दोन अटी शिक्षकांसाठी ठेवल्या.

१९१८ मध्ये सक्तीच्या व मोफत शिक्षणासाठी एक स्वतंत्र खाते स्थापन केले. त्यावर ङ्काडायरेक्टरफ आणि 'एज्युकेशनल इन्स्पेक्टर' या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या.

राष्ट्रीय दृष्टी असलेल्या शाहू महाराजांचे कार्य कोल्हापूर संस्थानापुरते व विशिष्ट समाजापुरते मर्यादित नव्हते ते तसे ठेवणे म्हणजे एक ऐतिहासिक शोकांतिका ठरेल. सत्तेचा उपयोग तळागाळातील व बहुजन समाजासाठी कसा करावा हे चालू व भावी राज्यकर्त्यांनी छ. शाहू महाराजांच्या सामाजिक व धार्मिक तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून शिकावे.

### छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य :

छत्रपती शाहू महाराजांनी राजकीय सुधारणांपेक्षा सामाजिक सुधारणांना महत्त्वाचे स्थान दिले. त्यातही सामाजिक सुधारणा करण्याच्या कार्याला गती देण्यासाठी शैक्षणिक विकासाला प्रमुख स्थान दिले. या काळात खेड्यांमध्ये प्राथमिक शाळा नव्हत्या. सर्वसामान्य बहुजन समाज अज्ञान व अंधश्रद्धेचे जीवन जगत होता. शिक्षण घेणे हे ब्राह्मण किंवा सावकारांचे काम आहे अशी प्रचलित समाजाची समजूत होती. ज्ञानाच्या क्षेत्रात ब्राह्मण समाजाची मक्तेदारी ब्रिटिशपूर्वकाळापासूनच निर्माण झाली होती. इंग्रजांनी विद्येची प्रवेशद्वारे सर्व जातींसाठी खुली केली. छत्रपती शाहू महाराजांनी या अज्ञानी बहुजन समाजामध्ये ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करण्याचा निर्धार केला.

शिक्षणातील अडचणींचे पेशवाईतील उदाहरण देताना शाहू महाराजांनी सांगितले की, श्री प्रतापसिंह महाराज छत्रपतींना (सातारा) पेशव्यांच्या ताब्यात असताना लहानपणी लिहिणे, वाचणे व शिकण्याचीही बंदी होती. तेव्हा त्यांच्या पूज्य व धोरणी आईने त्यांस रात्री बारा वाजता उठवून ब्राह्मणेत्तर पंतोजी कडून लिहिणे, वाचणे, शिकवण्याचे काम केले. पेशवाईत खुद्द छत्रपतींना चोरून मध्यरात्री शिक्षण घ्यावे लागत होते मग इतरांचे काय हा प्रश्न उपस्थित होतो.

### प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य :

समाजात शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी महाराजांनी योजनाबद्ध आखणी केली. प्राथमिक शिक्षणाचा पाया दृढ केल्यानंतर उच्चशिक्षणापर्यंत वाटचाल करण्याचा त्यांचा निश्चय होता. त्यांनी प्राथमिक शिक्षणाला तर प्राधान्य दिलेच परंतु त्याचबरोबर माध्यमिक व उच्च शिक्षणाकडेदेखील लक्ष दिले.

शाहू महाराज म्हणतात, रयतेमध्ये प्राथमिक व उच्च शिक्षणाचा प्रसार करण्याची माझी जोराने खटपट चालली आहे, शक्य तितक्या लवकर माझ्या रयतेस स्वराज्य देण्याचे माझे धोरण आहे. जर माझी मराठी प्रजा इयत्ता तिसरी शिकून तयार झाली असती तर त्यांना राज्यकारभाराचे हक्क आनंदाने देऊन मी विश्रांती घेतली असती. राज्यकारभाराचे अधिकारदान करण्यापूर्वी सर्व लोकांमध्ये विद्याप्रसार करणे गरजेचे आहे. प्राथमिक शिक्षणाच्या भरभक्कम पायावर उच्च शिक्षणाची इमारत उभी करण्याचा त्यांचा मानस होता.

इ.स. १९१३ मध्ये शाहू महाराजांनी प्रत्येक गावात निदान एक तरी शाळा असावी व ती शाळा गावात बहुसंख्येने राहणाऱ्या जातींच्या व्यक्तीने चालवावी असे म्हटले. शिक्षणाविषयी शिक्षकांच्या मनात आस्था निर्माण व्हावी व त्याने शिक्षणविषयक चळवळीला गती द्यावी असे महाराजांना वाटत होते. बहुजन समाजाच्या सर्वांगीण हितासाठी प्राथमिक शिक्षणाद्वारे छत्रपती शाहू महाराज व्यापक बैठक तयार करीत होते. त्या दृष्टीकोनातूनच त्यांनी निरनिराळ्या शैक्षणिक संस्था व व्यक्तींना आर्थिक सहकार्य केले. त्यामुळेच कोल्हापूर संस्थानांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा खूप मोठ्या प्रमाणावर विकास झाला.

### सक्तीचे सार्वजनिक शिक्षण :

महात्मा ज्योतिराव फुले यांनी बहुजन समाजाच्या विकासासाठी व उद्धारासाठी शिक्षण हे एक महत्त्वाचे शस्त्र मानले. बहुजन समाजाला शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे मत महात्मा फुले यांचे होते. महात्मा फुले यांच्या या शैक्षणिक धोरणाचा शाहू महाराजांनी स्वीकार केला. महाराजांनी सक्तीच्या शिक्षणाचे धोरण आखले. त्याअगोदर ५०० ते १००० लोक वस्तीच्या गावी कोठे शाळा सुरू करता येईल? कोणत्या सार्वजनिक इमारतीचा उपयोग करता येईल? याची माहिती त्यांनी संकलित केली. या गावांमधून ताबडतोब शाळा सुरू करण्याचे आदेश त्यांनी दिले. देवस्थानच्या उत्पन्नातून नित्य नैमित्तिक खर्च वजा जाता उरलेले उत्पन्न शाळेला द्यावे असे ठरवले.

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण (सार्वत्रिक) सक्तीचे आणि मोफत करण्यासाठी एक समिती नेमली. या समितीच्या शिफारशीनुसार कोल्हापूर शहर व तालुक्यात गावोगावी सक्तीच्या शिक्षणाचा अंमल इ.स. १९१६ पासून सुरू केला गेला. सप्टेंबर १९१६ मध्ये सक्तीच्या शिक्षणाचा कायदा कोल्हापूर संस्थानात करण्यात आला. शिक्षणासाठी योग्य वय असलेल्या मुलामुलींना शाळेत पाठवण्याबाबत पालक व गाव कामगार यांच्यावर कडक बंधने लागू केली. या सक्तीच्या व मोफत शिक्षण योजनेमुळे शिक्षणाच्या प्रसाराला विस्तृत स्वरूप प्राप्त झाले. या धोरणाचा इतका फायदा झाला की, १९१७-१८ साली शाळांची संख्या २७ व विद्यार्थ्यांची संख्या १२९६ इतकी होती. तर १९२१-२२ मध्ये ४२० शाळा व २२,००७ इतकी विद्यार्थीसंख्या वाढलेली दिसते. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महाराजांनी शैक्षणिक सवलत व शिष्यवृत्ती जाहीर केल्या.

ISSN No. 2394-5990

**स्त्री शिक्षण :**

स्त्री शिक्षणामुळे कुटुंब व समाजाचा विकास घडून येण्यास मदत होते. बहुजन समाजाप्रमाणेच स्त्री जीवनाच्या मागासलेपणाची शाहू महाराजांना जाणीव होती. त्यामुळे त्यांनी स्त्री शिक्षणाकडे लक्ष दिले. आपल्या सुनबाई इंदुमतीराणी साहेब यांना वैधव्य प्राप्त झाल्यानंतर महाराजांनी त्यांना शिक्षण देऊन त्यांच्याकडे कोल्हापूर संस्थानचे शिक्षण खाते सोपवण्याचा त्यांचा विचार होता परंतु, राणीसाहेबांच्या मृत्यूमुळे तो पूर्ण झाला नाही. 'मिस लिटल' या शिक्षणाधिकारी असणाऱ्या इंग्रज बाई मायदेशी गेल्यावर 'फीमेल ट्रेनिंग स्कूल' मधील शिक्षिका ङरखमाबाई केळकरफ यांना शिक्षणाधिकारी म्हणून नेमले. महाराजांनी स्त्री शिक्षणाला गतिमान केले. कोल्हापूर संस्थानात मुलामुलींच्या शाळा होत्या परंतु, मुलींच्या स्वतंत्र शाळा महाराजांनी स्थापन केल्या. मुलींच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीत महाराजांनी उदार दृष्टीकोन ठेवला होता. राजाराम कॉलेजमधील सर्व मुलींना शिक्षण मोफत केले होते. केळकर यांच्या कन्या रखमाबाई या महाराजांच्या मदतीनेच शिक्षणासाठी इंग्लंडला जाऊन वैद्यकीय शिक्षण पूर्ण करू शकल्या. प्रौढ व मागासलेल्या स्त्रियांसाठी महाराजांनी १९१९ मध्ये एक शासकीय आदेश काढून त्यांच्या शिक्षणासाठी व राहण्याजेवण्यासाठीची सर्व व्यवस्था दरबाराकडून मोफत करण्याची सोय केली.

**उच्च व व्यवसाय शिक्षण :**

प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच उच्च आणि व्यावसायिक शिक्षणाच्या विकासासाठी शाहू महाराजांनी प्रयत्न केले.१८५१ मध्ये कोल्हापूर येथे सुरू झालेले एका इंग्रजी शाळेचे १८८१ साली राजाराम महाविद्यालयात रूपांतर झाले. जहागीरदार व सरकारकडून मिळणाऱ्या वर्षासनातून या महाविद्यालयाचा खर्च चालत असे. वर्षासने बंद झाल्यानंतर दरबारातर्फे या महाविद्यालयाला दरवर्षी ५०००० रूपये महाराजांनी देण्यास सुरुवात केली.

प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाप्रमाणेच शाहू महाराजांनी व्यावसायिक शिक्षणालाही महत्त्व दिले. गावांचा कारभार व्यवस्थित चालविला जाण्यासाठी महाराजांनी पाटील स्कूल व तलाठी स्कूल सुरू केले. या शाळांमधून पाटील व तलाठ्यांना सर्वसाधारण जमा खर्च, कायदे, शांतता व सुव्यवस्था, महसूल विषयक दक्षता इत्यादी विषयाचे शिक्षण दिले जात. महाराजांनी शिक्षकांसाठी प्रशिक्षण केंद्र सुरू केले. तांत्रिक शिक्षणासाठी जयसिंगराव घाडगे तांत्रिक संस्था स्थापन केली. या संस्थेत लोहारकाम, गवंडीकाम व सुतारकाम यांसारख्या विषयांचे शिक्षण दिले जात असे. लष्करी शिक्षणासाठी इन्फंट्री स्कूल सुरू केले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यायाम व लष्करी शिक्षणाची ही आवड निर्माण होऊ शकली.

**वसतिगृह चळवळीचे निर्माते :**

छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा त्यातही उच्च शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा वेध घेऊन अनेक जातवार वसतिगृहे स्थापन केली. ग्रामीण भागातील शिक्षणाची ओढ असणाऱ्या गरिब व होतकरू विद्यार्थ्यांना शहरामध्ये उच्च शिक्षण घेता यावे यासाठी शाहू महाराजांनी ही वसतिगृहे स्थापन केली. अनेक वसतिगृहांना शाहू महाराजांनी स्वतः देणग्या दिल्या. तसेच काही वसतिगृहांना कायमचे उत्पन्न मिळावे म्हणून शेती व इतर सोयी उपलब्ध करून दिल्या.

छत्रपती शाहू महाराज हे धोरणी समाजसुधारक होते. सरुड- सागाव येथील पांडुरंग चिमणाजी पाटील हा विद्यार्थी मॅट्रिक पास झाल्यानंतर महाराजांनी त्याला बोलवून घेतले. मॅट्रिक परीक्षा पास होईपर्यंत त्याला आलेल्या अडचणीना समजून घेतले. पांडुरंग पाटील यांच्या पुढील उच्च शिक्षणासाठी आर्थिक अडचण लक्षात घेऊन त्यांना पन्हाळा वरील गुरुदेव दत्ताच्या देवळात त्यांच्या जेवणा-खाण्याची सोय केली व येथेच पहिल्या मराठा वसतिगृहाची सुरुवात झाली. वसतिगृह स्थापन करण्यापूर्वी न्यायमूर्ती रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, बापूसाहेब महाराज, रघुनाथ व्यंकाजी सबनीस, भास्करराव जाधव व दाजीराव अमृतराव विचारे यांचा सल्ला घेतला व शेवटी भारतातील पहिले व्हिक्टोरिया मराठा वसतिगृह स्थापन केले.

भारतातील विद्यार्थी वसतिगृहाचा पाया शाहू महाराजांनी घातला म्हणून त्यांना विद्यार्थी वसतिगृहाचे जनक असे संबोधले जाते. १५ एप्रिल १९२० रोजी नाशिक मधील उदाजी मराठा विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीच्या कोनशीला समारंभाच्या अध्यक्षीय भाषणात महाराज म्हणतात, माझ्या चिमुकल्या राज्यातील प्रजाजनांनी एका बाबतीत तरी विशेष नाव कमविले आहे, हे मी अभिमानपूर्वक सांगतो. ब्रिटिश पार्लमेंटला ङमदर ऑफ पार्लमेंट्सफ असे मोठया अभिमानाने इंग्रज व इतर लोक म्हणतात. त्याप्रमाणे कोल्हापुरास ङमदर ऑफ बोर्डिंग हाऊसेसफ म्हणजे विद्यार्थी वसतिगृहांची माता असे सार्थ नाव मिळाले आहे.

छ.शाहू महाराजांनी कोल्हापुरात निर्माण केलेल्या वसतिगृहांचा आढावा पुढीलप्रमाणे :

| अ.क्र. | वसतीगृहाचे नाव | स्थापना |
|---|---|---|
| १ | व्हिक्टोरिया मराठा बोर्ड | १८ एप्रिल १९०१ |
| २ | दिगंबर जैन बोर्डिंग | १९०१ |
| ३ | वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतिगृह | १९०६ |
| ४ | मुस्लिम बोर्डिंग | १९०६ |
| ५ | मिस क्लार्क हॉस्टेल | १४ फेब्रुवारी १९०८ |
| ६ | देवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग | २४ डिसेंबर,१९०८ |
| ७ | श्री. नामदेव बोर्डिंग | २ एप्रिल १९११ |
| ८ | पांचाळ ब्राह्मण वसतिगृह | १९१२ |
| ९ | श्रीमती सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह | २० मे,१९१५ |
| १० | इंडियन ख्रिश्चन हॉस्टेल | ७ जून १९१५ |
| ११ | राव बहादूर सबनीस प्रभू बोर्डिंग | १९१५ |
| १२ | आर्य समाज गुरुकुल | १८ मार्च १९१८ |
| १३ | वैश्य बोर्डिंग | १९१८ |
| १४ | ढोर चांभार बोर्डिंग | १९१९ |
| १५ | शिवाजी वैदिक विद्यालय वसतिगृह | ६ जुलै १९२० |
| १६ | श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस | १ जुलै,१९२० |
| १७ | सुतार बोर्डिंग | ६ जून १९२१ |
| १८ | नाभिक विद्यार्थी वसतिगृह | २४ जुलै १९२१ |
| १९ | सोमवंशीय आर्य क्षत्रिय बोर्डिंग | १६ ऑगस्ट १९२० |

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानापुरतेच वसतिगृह स्थापन करण्याचे आमुलाग्र काम मर्यादित ठेवले नाही तर महाराष्ट्रातील इतर भागातही त्यांनी देणगी रूपाने मदत देवून वसतिगृह स्थापनेची चळवळ व शिक्षणप्रसारास मदत हे कार्य सुरु ठेवले. शाहू महाराजांच्या या वसतिगृह निर्माण चळवळीच्या भूमिकेमुळे महाराष्ट्रातील बहुजन समाजातील गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणी दूर झाल्या. शाहू महाराजांच्या या वसतिगृह निर्माण करावयाच्या कार्यामुळे ज्ञानाची कवाडे बहुजनांसाठी उघडी करणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील यांसारख्या शिक्षण सुधारकांना प्रेरणा मिळाल्या.

**छ. शाहू महाराजांनी संस्थानाबाहेरील वसतिगृहांस दिलेली मदत**

| अ. क्र. | वसतिगृहाचे नाव | वर्ष | देणगी |
|---|---|---|---|
| १. | नाशिक उदाजी मराठा वसतिगृह | १९२० | १५०००/- |
| २. | अहमदनगर-श्री छत्रपती करवीर चौथे शिवाजी महाराज मराठा बोर्डिंग | १९२० | १५०००/- |
| ३. | नाशिक 'वंजारी समाज वसतिगृह' | १९२० | ५०००/- |
| ४. | नाशिक 'श्री शाहू छत्रपती बोर्डिंग' | १९१९ | ५०००/- |
| ५. | नागपूर चोखामेळा वसतिगृह | १९२० | ५०००/- |
| ६. | 'ताराबाई वसतिगृह' पुणे | १ डिसेंबर,१९२० | स्वखर्चातून स्थापन केले. |

**कामगार चळवळीस प्रेरणा :**

मुंबईमध्ये पीपल्स युनियन म्हणजेच कामगारांच्या लोकसंघाची स्थापना रावबहादूर सिताराम केशव बोले यांनी केली. शाहू महाराज या संघटनेचे आश्रयदाते होते. २४ नोव्हेंबर, १९१८ रोजी मुंबईमध्ये कामगारांसमोरील भाषणांमध्ये शाहू महाराज म्हणतात की, प्रत्येक प्रौढ व्यक्तीस मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे, म्हणजेच बहुजन समाजाच्या मताप्रमाणे राज्यकारभार चालला पाहिजे, येथेही इंग्लंडप्रमाणे मजुरांचे संघ पाहिजेत आणि सर्वांना आपल्या हक्कांची जाणीव झाली पाहिजे. भांडवलवाल्यात ब्राह्मण व वैश्य वृत्तीच्या लोकांचा विशेष भरणा आहे. त्यांना दाबात ठेवल्याशिवाय मजुरांची उन्नती होणार नाही. महात्मा फुलेंकडून प्रेरणा घेऊन नारायण मेघाजी लोखंडे यांनी मुंबईत पहिली कामगार संघटना निर्माण केली. अशा अनेक संघटना बांधण्याबाबत शाहू महाराजांनी कामगारांना प्रेरणा दिल्या.

१९७४ मध्ये कॉम्रेड वैद्य यांनी ङमहात्मा फुले आणि त्यांची परंपराफ हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाच्या ङशाहू महाराजांच्या कार्याची ऐतिहासिक महतीफ या लेखात ते म्हणतात, अखेरच्या दिवसात टिळकांप्रमाणेच शाहू महाराज हेही उदयोन्मुख कामगार वर्गाकडे आकर्षित झाले होते. मुंबईत मजुरांच्या सभेत भाषण करताना त्यांनी कामगारांच्या वर्गीय शक्तीचे स्वागत केले. ट्रेड युनियन बांधण्याच्या हक्काचा नि:संदिग्ध पुरस्कार केला. एवढ्यावरच न थांबता त्यांनी भांडवलदारांविरुद्ध कामगार वर्गाच्या लढ्याची महती वर्णन केली.

**छत्रपती शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव :**

१९१८ साली कानपूर येथे भरलेल्या कुर्मी क्षत्रिय परिषदेमध्ये शाहू महाराजांना त्यांच्या असामान्य कार्याबद्दल राजर्षी ही मानाची लोक पदवी देण्यात आली.

१९०२ साली शाहू महाराजांनी भारतामध्ये प्रथम कोल्हापूर संस्थानात दलित, मागास समाजासाठी आरक्षण देण्याचा कायदा केला. सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे कृतीशील प्रयत्न शाहू महाराजांनी केले. शाहू महाराजांनी मानवतावादी मूल्यांचा स्वीकार करून सर्वांना समतेची वागणूक देण्याची भूमिका स्वीकारली. शाहू महाराजांच्या याच पुरोगामी विचारांवर कृतिशील अंमलबजावणी करण्याची या देशाला गरज आहे.

शाहू महाराजांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य हे क्रांतिकारी स्वरूपाचे होते. उत्तर प्रदेशातील जनतेने शाहू महाराजांच्या विचारण्याची प्रशंसा करताना त्यांना क्रांतिकारक लोकनेता मानले. उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री मायावतींनी लखनौमध्ये राजर्षी शाहू महाराजांच्या क्रांतिकारक स्मारकाचे उद्घाटन केले. शाहू महाराजांच्या भारतातील शैक्षणिक कार्याची पोचपावती म्हणजे कानपूरच्या विद्यापीठाचे नामकरण 'छ. शाहू महाराज विश्वविद्यालय, कानपूर' असे करणे होय. या ऐतिहासिक विवेचनावरून या लोकराजाच्या कार्याची महती आपल्याला समजून येते.

**निष्कर्ष :**

शाहू महाराजांनी बहुजन समाजाचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी शिक्षण हा एकमेव उपाय शोधला. शाहू महाराज एका भाषणामध्ये म्हणतात, शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या आणि मोफत शिक्षणाची हिंदुस्तानला अत्यंत आवश्यकता आहे.

स्वातंत्र्याची ७५ वर्षे होऊन गेली परंतु अजूनही शिक्षण व्यवस्थेत म्हणावे असे सर्वसमावेशक धोरण भारतासारख्या विकसनशील देशाला लागू करणे शक्य झाले नाही. प्रत्येक भारतीयांच्या उत्पन्नावरील आयकरावर 'शिक्षण कर' हा अतिरिक्त कर घेऊन देखील उच्च शिक्षण आपण मोफत करू शकत नाही. शिक्षणातील गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षण व्यवस्थेतील मुठभर लोकांचे मक्तेदारी दूर करणे गरजेचे आहे. या सर्व सामाजिक व शैक्षणिक गोष्टींचे भान ओळखून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी शंभर वर्षांपूर्वी कोल्हापूर संस्थानांमध्ये शिक्षण व्यवस्थेतील मुठभर लोकांची मक्तेदारी कमी केली.

आज पुरोगामी शक्ती कमजोर होत आहेत व प्रतिगामी शक्ती बळावत आहेत. धार्मिक व जातीयवादी प्रवृत्ती राजकारणात बळावत आहेत. त्यामुळे पुरोगामी महाराष्ट्राच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील अडचणी दूर करण्यासाठी शाहू महाराजांच्या कृतिशील पुरोगामी विचारांच्या प्रसाराची आवश्यकता आहे.

कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार एका प्रस्तावनेत लिहितात, लोक सुजाण व्हावेत, सुखी व्हावेत, जातीजातीच्या कारणाने निर्माण झालेली कृत्रिम असमानता नाहीशी व्हावी, समाज गतिमान व्हावा, प्रगत व्हावा म्हणून शाहू महाराजांनी जीवनभर प्रयत्न केले. असा राजा होणे नाही. सर्वार्थाने तो जनतेचा राजा होता.

**संदर्भ साधने :**

१. साळुंखे नानासाहेब (२००६), शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, प्रथम आवृत्ती, कोल्हापूर.
२. पानसरे गोविंद अँड (२०१२), राजर्षी शाहू: वसा आणि वारसा, नागनालंदा प्रकाशन, चतुर्थ आवृत्ती, सांगली.

३.चव्हाण रा. ना. (२०१३), राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक विचारधारा व कार्य, प्रथम आवृत्ती, पुणे
४. धारवाडे बाबुराव (२००५), माझे शाहू कार्य, भाई माधवराव बागल विद्यापीठ, प्रथम आवृत्ती, कोल्हापूर.
५. मिस क्लार्क हॉस्टेल, कोल्हापूर सुवर्ण महोत्सवी खास अंक, १४ एप्रिल १९६१
६. सुर्यवंशी कृ. गो. (१९८४), राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे.
७. नाईक तू .बा. (२०१०),छत्रपती राजर्षी शाहू महाराज, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
८. डॉ.जयसिंगराव पवार (२०१८),राजर्षी शाहू छत्रपती :एक मागोवा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
९. मोरे दिनेश (२००६), आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास (१८१८-१९६०), के. एस. पब्लिकेशन्स, प्रथम आवृत्ती, पुणे.
१०. डॉ. किशोर कुमार गव्हाणे व डॉ. एस. पी. शिंदे (२०१४) महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद.
११. डॉ. कठारे अनिल (२००९), आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.